
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# लोकशाहीर व आण्णाभाऊ साठे यांचे साहित्य व समाजचिंतन

**प्रा. श्रीरंग शामराव लोखंडे**
**राज्यशास्त्र विभाग,**
**यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.**

**प्रस्तावना :-**



जागतिक स्तरावरून दखल घ्यावी असे थोर विचारवंत, कादंबरीकार, कथाकार, शाहीर, क चित्रपट कथाकार कष्टकऱ्यांच्या आयुष्याला आकार देणारे सर्वसामान्यांचे थोर लोकशिक्षक, समाज शाहीरी वाड्.मयाचे भाष्यकार व मराठी साहित्यातील मापदंड ठरावे अशा अण्णा भाऊ साठे यांचा जन्म १ ऑगष्ट १९२० ला साध्या खेडयात झाला असला आणि १८ व्या शतकापासुनच नव्हे तर पिढयानपिढया भारतीय समाज गुलामगिरीत फसलेला असला तरी काही उपेक्षित समाजाच्या दृष्टीने या शतकात फायद्याच्या अशा काही नविन बाबी निर्माण झाल्या आणि त्याचा लाभही भारतीय समाजातील दुर्लक्षीत घटकांना मिळाला. शैक्षणिक अधिकार आणि व्यक्तीस्वातंत्र या दोन महत्वपुर्ण बाबींचा याच काळात उदय झाला असल्यामुळे याचा उल्लेख करणे महत्वाचे ठरते त्यामुळे भारतीय समाजातील समाजसुधारकांना नविन दृष्टी मिळाली. महात्मा ज्योतीबा फुले यांनी थॉमस पेन यांच्या मानवी हक्कासंबंधीच्या ग्रंथाचा अभ्यास करून मानवी हक्काचं महत्व समजुन घेतलं पेनच्या मानवी हक्कासंबंधीच्या विचारांचे चिंतन करून डोळसपणे व्यवहार जाणला. मित्राच्या लग्नात शुद्र म्हणून भोगाव्या लागलेल्या अपमानाने सामाजिक कार्याचा पिंड असलेल्या फुलेंचे मन जागृत झाले. तेव्हाच ते सामाजिक लढयास खऱ्या अर्थाने सज्ज झाले.

उच्चभ्रु समजल्या जाणाऱ्या समाजाचे सामाजिक मन आजही परीवर्तनीय झालेले नाही. परंपरा, रूढी, धर्माधपणा या पासुन लोकशाहीला धोके निर्माण झालेले आहे म्हणून फुलेंनी स्वातंत्र लढयाला प्राधान्य न देता जाणीवपुर्वक सामाजिक लढा सुरू केला महात्मा फुले, राजश्री शाहू, डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक लढयामुळे शुद्र व अतिशुद्रांची सामाजिक अस्मिता जागृत होवून फुले- आंबेडकरांची जिवन संजीवनीची प्रेरणा घेवूनच समाजचिंतनपर लेखन करणाऱ्या साहित्यीकांचा उदय झाला या समाज चिंतनातुनच समतेच्या आंदोलनाला प्रारंभ झाला. या प्रेरणेचा धागा धरून त्याच दिशेने अण्णा भाऊ साठे यांनी दलित, उपेक्षीत माणसाचं जीवन आपल्या साहित्यातुन शब्दबध्द केले. त्यामुळे अण्णाभाऊचे साहित्य हे उपेक्षीत समाज चिंतनाचा अग्रबिंदू ठरतो

**अध्ययनाचे उद्देश : -**

१) अण्णाभाऊ साठे यांचा थोडक्यात जिवन परिचय करून घेणे.
२) अण्णाभाऊ साठे यांचा साहित्यातील समाजचिंतन/आस्मिता अभ्यासणे.
३) अण्णाभाऊ साठे यांचा साहित्यातील प्रस्थापिताविरूध्दचा विद्रोह अभ्यासणे.
४) अण्णाभाऊ साठे यांचा साहित्यातील समतेचा लढा जाणून घेणे.

५) अण्णाभाऊ साठे यांचा साहित्यातील समाज चिंतन अभ्यासणे.

## गृहितके : -

१) अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातुन कष्टकरी, श्रमकरी, उपेक्षीत, असलेली माणसे आपल्या साहित्यातुन मोठी केली.

२) अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातुन तळागाळातील उपेक्षीत माणसेच नव्हे तर स्त्रीयांना सुध्दा सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली.

३) अण्णाभाऊ साठे यांना आपल्या साहित्यातुन दलित उपेक्षीत माणसाचा विकास अपेक्षीत होता.

## अध्ययन पध्दती : -

सदरील शोध निबंधासाठी निदानात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे. या संशोधन कार्यासाठी ग्रंथ, शोध ग्रंथ, वर्तमानपत्र नियतकालीके यांचा आधार घेवून तथ्यसंकलन केले.

## विश्लेषणात्मक निर्वचन : -

अण्णाभाऊचे जिवनच एक मृत्यूजय लढाईची गाथा आहे जगण्याच्या अवस्थेचा विचार केल्यास कोणताही माणूस गहिवरल्याशिवाय राहणार नाही परंतु अण्णा भाऊ साठे आपल्या विचारापासुन कधीही ढळले नाही. ते म्हणतात, “मला लढा मान्य आहे, रडगाणे मान्य नाही." स्वत:च्या अस्मितेशी कधीही तडजोड करता कामा नये. म्हणून त्यांनी आपल्या कथेतुन नायक, नायिकांची अस्मिता जागवून ठेवली. परंपरावादी विचाराला व धंदयाला नाकारून नवीन आदर्श समाजाची स्वप्ने त्यांनी पाहिली. 'वैजयंता' या कादंबरीच्या प्रस्थावनेत म्हणतात, “देश सुखी व्हावा, समृध्द व्हावा, नि सभ्य व्हावा, येथे समता नांदावी या भुमिकेचे नंदनवन व्हावे अशी मला रोज स्वप्ने पडतात.”

अण्णाभाऊच्या साहित्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मार्क्स, गॉर्की यांच्या विचारांचा अदम्य संगम आहे. अण्णाभाऊंनी जरी गॉर्कीची प्रेरणा घेतली तरी भारतीय समाजातील जातीची तटबंदी त्यांनी डोळसपणे केवळ पाहिलीच नाही तर अनुभवली, भोगली सुध्दा. परिणामी अण्णाभाऊच्या साहित्यात बंडखोर नायक नायिका उदयास आले. अण्णाभाऊंनी समाजातील उपेक्षीत माणसाचे समाजजिवन साहित्यात आणून त्यांना प्रतिष्ठा प्रदान केली. अण्णा भाऊंनी दलित, दुबळया, तळागाळातील लोकांच्या वाटयाला आलेली नैतिकता पाहिली, भोगली. त्यामुळे त्यांच्या नैतिकतेचे ते समर्थन करतात. प्रस्थापितांच्या अन्यायाचे विद्रोहाने प्रतिकार - करतात तसेच आपल्या साहित्यातुन न्याय, समता, माणुसकीला जोगृत ठेवून स्वर्ग, मोक्ष, पुर्नःजन्म, कर्म, जातीव्यवस्थेला ते विद्रोहाने नाकारतात.

अण्णाभाऊ हे लोकलेखक होते. ते लोकनायक होते ते दलित, उपेक्षीत , कष्टकरीचे नायक होते. त्यांची सामान्य माणसावर निष्ठा होती. म्हणून अण्णाभाऊ एका कादंबरीच्या प्रस्तावनेत लिहीतात, “माझी जिवनावर फार निष्ठा असुन मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे ती जगतात, जगाला जगवितात, त्यांच्या बळवरचं हे जग चालत. त्याचे श्रम आणि त्याचं यश यावर माझा विश्वास आहे. त्यांना विद्रुप करणं मला आवडत नाही ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसुन दलितांनी, कष्टकऱ्यांनी आपल्या हातावर पेलली आहे असे मी ठामपणे मानतो. वैफल्य हे तलवारीच्या धुळीसारखं असतं नि ती धुळ झटकून तलवार लखलखीत करता येते.” _मराठी साहित्यातील एक निखळ तारा म्हणून अण्णाभाऊ साठे यांचे अस्तित्व खऱ्या अर्थाने तेजोमय झालेले दिसून येते. मराठी साहित्याच्या युगदालनात एकापेक्षा एक श्रेष्ठ अक्षर मनोरे निर्माण करतांना सामाजिक लढयाशी अभिन्न नात जोडून, माणुसकीची मुरवत ठेवून, मराठी मातीशी इमान बाळगून असलेले प्रतिभावंत व सृजनशिल लेखक, साहित्यीक म्हणून प्रकर्षाने समोर येतात. अण्णाभाऊ हे अवघ्या महाराष्ट्राला लोकशाहीर म्हणूनच परिचीत असले तरी कथा, कादंबऱ्या, लोकनाटय, वगनाटय या सामाजिक भान आणि वास्तव्य रेखाटणारे अक्षर शिल्पे रचणारा साहित्यीक एक प्रगल्भ परीपक्व चित्रपट निर्माते म्हणूनही संपुर्ण साहित्य जगात अण्णा भाऊ आपली एक आगळी

वेगळी छाप पाडतात. स्वप्न, रम्यता व श्रृंगाराला बाजुला सारून जिवनातील प्रखर वास्तव आपल्या साहित्यातुन ते व्यक्त करतात. ते सामाजिक चिंतनाच्या लढयाला हिमालयीन उतुंग शिखरावर नेणारे प्रखर वास्तववादी शब्दांकन करणारे होते.

अण्णाभाऊंचे विचार आणि साहित्य विज्ञाननिष्ठा, समाजचिंतनाचे होते महात्मा फुले, डॉ. आंबेडकरांच्या विचारांवर त्यांची निष्ठा होती. म्हणून त्यांनी डॉ. आंबेडकरांना ‘फकीरा' ही कादंबरी अर्पण केली. अण्णा भाऊंना दलित, उपेक्षीत माणसाचा विकास अपेक्षीत होता. आदर्श जातीविहीन समाजव्यवस्थेचे त्यांचे स्वप्न होते म्हणूनच त्यांनी 'मरीआईचा गाढा' , 'सापळा', 'स्मशानातील सोनं', 'थडग्यातील हाडं' या सारख्या सुधारणावादी, परीवर्तनवादी, कथा, कादंबरी लिहल्या दलित शोषित माणसाला समर्थ व डोळसं करण्यासाठी ज्या महापुरूषांनी आपले स्वतःचे आयुष्य समर्पित केले. अण्णाभाऊंनी क्रांतीगुरू लहूजी साळवे, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, संत गाडगेबाबा इत्यादी नावांचा उल्लेख त्यांनी आपल्या शाहीरीतुन, कवनातुन केला. अण्णा भाऊंनी मराठी साहित्यात सामाजिक क्रांती घडवून आणली. साहित्य हे कुणा एका जातीची मक्तेदारी नाही असे ठणकावून सांगितले. ज्या ज्या माणसांना प्रस्थापित साहित्यीकांनी नाकारलं त्या त्या माणसांना अण्णा भाऊंनी स्विकारून आपल्या साहित्यातुन नायक बनवलं. मग तो कंजारी समाजाचा 'बरबादया कंजारी' असेल किंवा आदिवासी समाजाचा 'व्यंकु माकडवाला' अथवा 'सावळा मांग' असेल , ‘तायनू महार' असेल इत्यादींच महत्व त्यांनी आपल्या साहित्यातुन चित्रण केल्यामुळे त्यांचे साहित्य भारतातच नव्हे तर रशिया, जर्मनी, झेक यासारख्या अनेक परकीय देशात लोकप्रिय झाले आहे. अण्णाभाऊंचे साहित्य वास्तववादी जिवनवादी असल्यामुळे त्यांच्या कलाकृती अधिक अर्थपुर्ण व बोलक्या ठरतात. जातीवादी विषम समाज व्यवस्थेविरूध्द जीवनभर त्यांच्या साहित्यांनी आग ओकली. ‘सापळा' या कथेच्या माध्यमातुन येथील प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या विरोधात दंड ठोकुन विद्रोह करण्यास प्रेरणा दिली. 'चिखलातील कमळ' या कादंबरीच्या माध्यमातुन धर्माच्या नावावर माणसामाणसात प्रेम आपुलकी नाकारणाऱ्या व्यवस्थेचा या कादंबरीच्या माध्यमातुन कडाडून विरोध केला.

## सारांश : -

अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातुन दिलेले महत्वपुर्ण विचार समाजातील दलित उपेक्षीत, समाज चिंतनास, समाज लढयाला लाभदायक आहेतच शिवाय येथील गुलामी व्यवस्थेला हादरा देणारे आहेत. त्यांच्या साहित्यात मानवी समाजाची स्वातंत्र्य, समता, बंधुता अशी मुल्य असुन महात्मा फुल्यांची व्यापक दृष्टी आहे, शाहू राज्यांची सामाजिक जाणीव आहे, आणि बाबासाहेब आंबेडकरांचा स्वाभिमान आहे. “गुलामाला गुलामिची जाणीव करून दया. म्हणजे तो बंड करून उठेल.” हेच बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातुन मांडलं. हजारो वर्ष ज्यांची धर्माच्या व सामाजिक बंधनाच्या नावावर फसगत केली त्यांना हक्कांची व अधिकाराची जाणिव करून देणे आणि विषमतेवर आधारीत समाजव्यवस्थेचे कपट कारस्थान लोकांच्या समोर उघड करणे असा समाज चिंतनाचा दुहेरी हेतु अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातुन अधोरेखीत केला आहे. भांडवलदार, धनाडे सावकार, धर्माचे ठेकेदार, जातीद्वेषाचे पुजारी, समाजशोषक अशा स्थितीवादी, स्वार्थी क्रुरकर्त्या वर्गाने निर्माण केलेली विषमता त्या विषमतेतुन निर्माण झालेली त्या लोकांची मक्तेदारी, शोषक वृत्ती उजागर करून समाजचिंतन करून समाज चळवळीला अण्णाभाऊ साठेनी खऱ्या अर्थाने न्याय दिला.

## संदर्भग्रंथ सुची :

१) हरगीले तुकाराम :- “डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे वारसदार अण्णाभाऊ साठे " प्रबोधन प्रकाशन, सिडको, नांदेड,' ऑगष्ट २०१०

२) करडे प्रा. रमेशः- “बहुजननायक अण्णाभाऊ साठे ' मुक्तरंग प्रकाशन लातुर, १९ मार्च २००६

३) हनवंते व्ही.एच :- “ अण्णाभाऊ साठे आणि सामाजिक परितर्वनाची दिशा " सुधीर प्रकाशन बोरगाव (मेघे) वर्धा, १४ एप्रिल २००३

४) खडसे खुशाल :- 'अक्षर' साहित्याचा निर्माता अण्णाभाऊ साठे, नेहा प्रकाशन नागपूर, एप्रिल २००६